# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१९/1752 दि. 29/7/19

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

विषयः **सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) तसेच खुल्या प्रवर्गातून (EWS) अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिष्यवृत्तीसाठी अनुज्ञेय शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत...**

संदर्भः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/२०१९/१००२१, दि.२६.०७.२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये सर्व अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग (SEBC) तसेच खुल्या प्रवर्गातून (EWS) दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागू आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे लाभ देण्यात येतात.

**अ) शिक्षण शुल्कः-**

| कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|
| | शासकीय | अशासकीय अनुदानित | टप्पा अनुदानित (विना अनुदानित) | कायम विना अनुदानित |
| **व्यावसायिक अभ्यासक्रम** | | | | |
| रु. २.५० लाखांपर्यंत | १००% | १००% | ५०% | ५०% |
| रु. २.५० लाख ते रु. ८ लाखांपर्यंत | ५०% | ५०% | ५०% | ५०% |
| **बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम** | | | | |
| रु. ८ लाखांपर्यंत | १००% | १००% | १००% | १००% |

**ब) परीक्षा शुल्कः-**

| | |
|---|---|
| **व्यावसायिक अभ्यासक्रम** | परीक्षा शुल्काच्या ५०% |
| **बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम** | परीक्षा शुल्काच्या १००% |

तरी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि.१४.०२.२०१८ अन्वये सर्व अधिनस्त महाविद्यालये / संस्था यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटीव्दारे अर्ज करणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना १००% शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेऊ नये व ज्या विद्यार्थ्यांना ५०% शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५०% शिक्षण शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांना या योजनेसाठी आवश्यक सर्व कागदपत्रे सादर करण्याबाबत स्पष्ट सूचना देऊन आवश्यक ती सर्व मदत / मार्गदर्शन महाविद्यालय/संस्थांनी करावी अशा सूचना आपणांस देण्यात येत आहेत.

RSDhamankar

**(डॉ.राजेंद्र धामणस्कर)**
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
**कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,**
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

प्रतः मां. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.